(72)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** गेवराई **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0044 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/01/2020 23:24 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 29/01/2020

**Date To ( दिनांक पर्यंत):** 29/01/2020

**Time From (वेळेपासून):** 13:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:30 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 29/01/2020 **Time (वेळ):** 22:52 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 027 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/01/2020 22:52 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 02 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कोर्टाचे समोरील हॉटेल , राजे जुसबार गेवराई ,गेवराई

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संदीप दत्तु पवार

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा चकलांबा ,गेवराई ,गेवराई,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा चकलांबा ,गेवराई ,गेवराई,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9552052233

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रल्हाद सदाशिव लोखंडे | | | 1. तहसील कार्यालय गेवराई ,गेवराई , गेवराई,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सय्यद माजेद सय्यद कादर | | | 1. रा शिक्षक कॉलनी गेवराई ,गेवराई , गेवराई,बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम एक लाख रुपये | 100,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 100,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक :- 29/01/2020 फिर्याद मी संदीप दत्तु पवार, वय 33 वर्षे, धंदा- शेती व चालक रा. चकलांबा ता. गेवराई जि.बीड. मो.नं.9552052233.मी दि.17/01/2020 रोजी लाप्रवि, कार्यालय, बीड येथे श्री.हनपुडे पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि, बीड यांचेसमक्ष तक्रार दिली होती की, दिनांक 29/09/2018 रोजी मी शहागड येथुन वाळु भरुन गावाकडे येत असतांना महसुलच्या पथकाने माझी गाडी पकडुन तहसील कार्यालयात लावुन टाकली. माझी गाडी सोडण्यासाठी तहसील कार्यालय, गेवराई येथील नायब तहसीलदार श्री. लोखंडे व खा.ई. सय्यद माजेद हे 1,00,000/-रुपयांची मागणी करत आहेत. तरी तहसील कार्यालय, गेवराई येथील नायब तहसीलदार श्री. लोखंडे व खा.इ. सय्यद माजेद यांचेवर कायदेशीर कारवाई करावी, वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.मी दिलेल्या तक्रारीवरुन दि.17/01/2020 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री.हनपुडे पाटील यांनी नायब तहसीलदार लोखंडे व खा.ई. सय्यद माजेद हे माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे याबाबत तहसील कार्यालय, गेवराई येथे मला व पंच क्र.1 केदार यांना पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सदर लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने मला व पंचाना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मला व पंच क्र.1 यांना नायब तहसीलदार लोखंडे व सय्यद माजेद यांचेकडे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्यात आली. लाचमागणी पडताळणीत लोकसेवक लोखंडे आणि सय्यद माजेद यांनी माझ्याकडे माझी गाडी सोडण्यसाठी 1,00,000/-रु. लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले. तसा दि.17/01/2020 रोजीचे लाचमागणी पडताळणीचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. त्यानंतर लोकसेवक लोखंडे व सय्यद माजेद यांचेविरुध्द लाच रक्कम उपलब्ध झाल्यानंतर सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे ठरले. त्यावरुन आज दि.29/01/2020 रोजी गेवराई येथे सुरक्षितस्थळी दोन शासकीय पंचासमक्ष श्री.हनपुडे पाटील यांनी मला व दोन्ही पंचांना अँथ्रासीन पावडर व अल्ट्रावहायलेट लम्प यांचा उपयोग व गुणधर्म सांगुन त्याचे प्रात्यक्षीक दाखवुन मी हजर केलेल्या 1,00,000/-रु.लाच रकमेस अँथ्रासीन पावडर लावली व सदरची लाच रक्कम ही माझे पँटचे समोरील उजवे खिशात ठेवली. मला लाच स्वीकृतीनंतर करावयाचा ईशारा नेमुन दिला. वगैरे बाबींचा सापळापुर्व कारवाईचा पंचनामा करण्यात आला.सापळापुर्व कारवाईचा पंचनामा पुर्ण झाल्यानंतर मला व दोन्ही पंचांना व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हईस रेकर्डर चालु करुन माझ्याकडे देऊन मला व पंच क्र.1 यांना लोकसेवक लोखंडे व सय्यद माजेद यांना लाच रक्कम देण्यासाठी तहसील कार्यालय, गेवराई येथे रवाना करण्यात आले. आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र.2 हे येत होते. मी व पंच क्र.1 असे

दोघेही तहसील कार्यालय, गेवराई येथे गेलोत. त्यानंतर तेथे माझेत व सय्यद माजेद यांचेत चर्चा झाली. त्यानंतर आम्ही नायब तहसीलदार लोखंडे यांचेकडे गेलोत. तेथे आमच्यात चर्चा झाली. व नायब तहसिलदार लोखंडे यांनी पैसे सय्यद माजेद यांचेकडे देण्यास सांगितले त्यावर मी पंच क्र.1 व माजेद असे कार्यालयाचे बाहेर आलोत. माजेद हे मला घेऊन कोर्टाच्या समोरील हटेल राजे ज्युसबार येथे आलोत. हटेलमध्ये गेल्यानंतर सय्यद माजेद यांनी पैशाबाबत विचारणा केली त्यावेळी मी माझे उजवे हाताने पँटचे समोरील उजवे खिशातुन लाच रक्कम 1,00,000/- रुपये सय्यद माजेद यांना दिले असता सय्यद माजेद यांनी सदरची 1 लाख रुपये लाच रक्कम ही उजवे हाताने स्वीकारुन त्यांनी परिधान केलेल्या पँटच्या समोरच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर मी हटेलच्या बाहेर येऊन मला लाच स्विकारल्या बाबतचा नेमुन दिलेला पुर्व नियोजीत इशारा केला. इशारा प्राप्त होताच श्री.हनपुडे पाटील हे पंच क्र.2 व त्यांचे स्टाफसह आमचेजवळ आले. माझ्याकडील व्हईस रेकर्डर बंद केला. तेव्हा श्री.हनपुडे पाटील यांनी सय्यद माजेद यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर श्री.हनपुडे पाटील यांनी पंच क्र.1 यांना पंच क्र.2 यांचेसमक्ष विचारणा केली की मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.1 यांनी सांगितले की, तक्रारदार यांना नायब तहसिलदार लोखंडे यांनी पैशाची मागणी करुन सय्यद माजेद यांचेकडे देण्यास सांगितले त्यांनतर सय्यद माजेद यांनी पैशांची मागणी करुन स्वत: 1,00,000/-रु. लाच रक्कम स्वीकारली आहे, असा खुलासा पंच क्र.1 यांनी केला. त्यानंतर श्री.हनपुडे पाटील यांनी सय्यद माजेद यांना लाच रक्कमबाबत विचारले असता सय्यद माजेद यांनी सदरची लाच रक्कम ही त्यांचे पँटचे समोरील उजवे बाजुच्या खिशात ठेवल्याचे सांगितले. त्यानतंर श्री.हनपुडे यांनी सय्यद माजेद यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी सय्यद माजेद सय्यद कादर, वय 35 वर्ष, रा. शिक्षक कलनी, गेवराई असे सांगितले. सय्यद माजेद कडील 1 लाख रुपये पंचासमक्ष ताब्यात घेतले. त्यानंतर आपण घटनास्थळावर प्राथमीक कारवाई करुन सय्यद माजेद यांना घेऊन तहसील कार्यालय, गेवराई येथे घेऊन आलात. तहसील कार्यालय, गेवराई येथे आल्यानंतर नायब तहसीलदार लोखंडे यांना ताब्यात घेऊन झालेल्या घटनेबाबत माहिती देऊन त्यांना त्यांचा परिचय विचारला असता त्यांनी त्यांचा परिचय प्रल्हाद सदाशिव लोखंडे, नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई असा सांगितला. त्यानंतर आपण नायब तहसीलदार लोखंडे व सय्यद माजेद यांना घेऊन पोलीस ठाणे गेवराई येथे आलात.तरी तहसील कार्यालय, गेवराई येथील नायब तहसीलदार लोखंडे आणि खाजगी ईसम सय्यद माजेद यांनी माझ्याकडे माझी गाडी सोडण्यासाठी दि. 17/01/2020 रोजी 1,00,000/-रु.लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन आज दि.29/01/2020 रोजी स्वत: शासकीय पंचांसमक्ष स्वीकारली असता लोकसेवक लोखंडे व सय्यद माजेद यांना लाचेच्या रकमेसह 13.30 वा. रंगेहात पकडले आहे. लाच रक्कम 1,00,000/-रु. पंचांसमक्ष सय्यद माजेद यांचेकडुन जप्त करण्यात आलेली आहे. तरी माझी प्रल्हाद सदाशिव लोखंडे, नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई व सय्यद माजेद सय्यद कादर रा. गेवराई यांचेविरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SATISH BABURAO WAGH(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाव):** SATISH BABURAO WAGH
**Rank(पद):** PI(Inspector)
**No.(सं.):** PI

पोलीस ठाणे अंमलदार
पो. स्टे गेवराई